**<u>ठळक बातम्या</u>**

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधल्या संविधान मंदिराचं लोकार्पण / राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद म्हणजे राज्यघटनेचा रक्षणकर्ता असल्याचं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन
- झारखंड दौऱ्यात प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी दाखवला ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा, सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- देशातील प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या दूरदर्शनची ६५ वी गौरवशाली वर्षपूर्ती

  **आणि**
- बेल्जियमध्ये ब्रुसेल इथं झालेल्या डायमंड लीग स्पर्धेत नीरज चौप्राला रौप्य पदक

**<><><><><>**

राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद म्हणजे राज्यघटनेचा रक्षणकर्ता आहे, राज्यघटना ही मिरवण्यासाठी नसून वाचून, समजून घेण्यासाठी आणि आदर करण्यासाठी आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचं लोकार्पण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातल्या कार्यक्रमात दूरदृश्य पद्धतीनं केल्यानंतर ते आज बोलत होते. राज्यघटनेची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं ही मंदिरं उभारण्यात आली आहेत. आंतरराष्ट्रीय

लोकशाही दिनी या संविधान मंदिराचं उद्घाटन करण्याचा हा क्षण अविस्मरणीय असून या मंदिरामुळे राज्यघटनेबद्दल जागृती वाढेल, राज्यघटना हे सुद्धा आपलं खरं मंदिर आहे, अशी ग्वाही धनखड यांनी दिली. राज्यघटनेबद्दल जाणून घेणं ही एक निरंतर प्रक्रिया आहे, असं ते म्हणाले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात शिक्षण घेतलं आणि त्या शिक्षणाच्या जोरावर इतकं मोठं योगदान दिलं, त्या ठिकाणी हा कार्यक्रम होणं हे सौभाग्य असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड--बाईट--प्रधानमंत्री**

राज्यघटनेनं दिलेल्या आरक्षणाला काही लोक विरोध करत आहेत, मात्र आरक्षण हा भारताचा, राज्यघटनेचा आत्मा आहे. आजच्या युवांनी राज्यघटनेचा अनादर करणाऱ्यांविरुद्ध लढण्याची तयारी ठेवावी, सर्वांनी स्वहिताच्या आधी देशहिताचा विचार करावा, असं आवाहन त्यांनी केलं. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे कौशल्यविकास, रोजगार, स्वयंउद्योजकता आणि नवनिर्मिती मंत्री मंगलप्रभात लोढा आणि इतर यावेळी उपस्थित होते. भारत ही जगातली सर्वात जास्त विविधतेनं नटलेली लोकशाही आहे आणि हीच विविधता आपल्या लोकशाहीला बळ देते, असं मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं.

यावेळी 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि त्यांच्या पत्नी सुदेश धनखड यांनी वृक्षारोपण केलं.

**<><><><><>**

सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केला असून गरीब, आदिवासी, दलित, वंचित, मागासवर्गीय, महिला, युवावर्ग आणि शेतकऱ्यांना प्राधान्य दिलं जात आहे, असं प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आपल्या झारखंड दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात आज ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्य्रक्रमात प्रधानमंत्र्यांनी ६६० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि राष्ट्रार्पणही केलं. देशातल्या आदिवासी बंधुभगिनींसाठी  प्रधानमंत्री जनमन योजना राबवली जात असून या योजनेमार्फत अति मागास जमातीतल्या बांधवाना सहाय्य केलं जात आहे, असं त्यांनी सांगितलं. केंद्रसरकारच्या कल्याणकारी योजनांअंतर्गत बांधण्यात आलेल्या  देशभरातल्या दोन कोटी नवीन घरांच्या वाटपाचा शुभारंभ आणि ४६ हजार लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश सोहळा देखील या कार्यक्रमात पार पडला. या योजनेच्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात एकूण ३२ हजार कोटी रुपयांचा थेट मदतीचा पहिला हप्ता जमा करण्यात आला. प्रधान मंत्री आवास योजना- ग्रामीणच्या २० हजार लाभार्थ्यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आवास मंजुरी पत्रांचं वाटपही करण्यात आलं.

**<><><><><>**

आज अभियंता दिन, देशाचे महान अभियंता सर एम. विश्वेश्वरैया यांचा जन्मदिन अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. देशाची प्रगती, नवनिर्मिती आणि नव्या आव्हानांचा सामना करण्यात अभियंत्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही सर्व अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ओणमनिमित्त सर्व देशबांधवांना शुभेच्छा दिल्या आहेत. ओणम चा सण सर्वांच्या जीवनात शांती, समृद्धी आणि उत्साह घेऊन येवो अशी कामना प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमवरच्या आपल्या संदेशात केली आहे. ओणम हा केरळच्या गौरवशाली संस्कृतीचा सण असून मल्याळी बांधव जगभरात हा सण मोठया उत्साहानं साजरा करत असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

दहशतवाद विरोधातली संरचना बळकट करण्यासाठी NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्था आणि राज्य दहशतवाद विरोधी पथकांमध्ये सहकार्य आणि समन्वय वाढण्याची गरज असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं झालेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय सुरक्षा धोरण परिषदेत बोलत होते.

जम्मू-काश्मीर, कट्टर डावी विचारसरणी आणि आणि ईशान्य भारतातील राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित समस्या सोडवण्याच्या अनुषंगानं झालेल्या प्रगतीबद्दल तसंच माओवादा विरोधातल्या प्रयत्नांमध्ये यश मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. ज्या राज्यांनी सशस्त्र गटांनी व्यापलेली क्षेत्र मुक्त करण्यात यश मिळवलं आहे, त्यांनी सतर्क राहावं असंही त्यांनी सुचवलं.

भारताला 2047 पर्यंत समृद्ध, मजबूत आणि विकसित भारत बनवण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं पूर्ण करण्यासाठी राज्यांच्या पोलीस महासंचालकांनी काम करावं असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

नवी दिल्लीत काल चौथी जागतिक जैविक भारत २०२४ परिषद पार पडली. या परिषदेत जैविक तंत्रज्ञान क्षेत्रातली देशाची प्रगती दाखवण्यात आली. तीन दिवस चाललेल्या या परिषदेचा विषय जैविक तंत्रज्ञानतील नवोन्मेष, जैविक निर्माणाच्या शक्यता तसचं संधी आणि त्याचा जैविक अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव असा होता. जैविक तंत्रज्ञान क्षेत्रातील ११ स्टार्टअप कंपन्यांची उत्पादनही यावेळी प्रदर्शित करण्यात आली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या मेरठ इथल्या झाकीर कॉलनीत काल इमारत कोसळून झालेल्या अपघातानंतर सुरु केलेलं मदत कार्य आज सकाळी पूर्ण झालं. आज या ढिगाऱ्यातून ५ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकांनी हे मदतकार्य केलं. ही दुर्घटना घडली तेव्हा इमारतीत १५ जण होते. अशी माहिती जिल्हाधिकारी दीपक मिना यांनी दिली. या अपघातातली मृतांची संख्या आता १० झाली आहे.

**<><><><><>**

देशातील प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेलं दूरदर्शन आज आपली ६५ गौरवशाली वर्षे पूर्ण करत आहे. १५ सप्टेंबर १९५९ रोजी स्थापन झालेल्या दूरदर्शनने भारताच्या प्रसारण युगाची सुरुवात केली. तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी त्या दिवशी दूरदर्शनच्या पहिल्या प्रसारणाचं उद्घाटन केलं होतं. १९७५ पर्यंत दूरदर्शन आकाशवाणीचाच घटक होता. १ एप्रिल १९७६ रोजी, त्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या एका स्वतंत्र विभागात रूपांतर झालं आणि ते प्रसार भारती अंतर्गत आलं. सरकारचं स्वायत्त सार्वजनिक सेवा प्रसारक असलेलं दूरदर्शन प्रसार भारतीच्या दोन विभागांपैकी एक आहे. आज, दूरदर्शन

आपल्या स्टुडिओ आणि ट्रान्समीटरच्या विशाल जाळ्यासह देशातली सर्वात मोठी प्रसारण संस्था आहे.

<><><><><>

भारताच्या नीरज चोप्रानं बेल्जियमध्ये ब्रुसेल इथं झालेल्या डायमंड लीगचं सलग दुसऱ्यांदा रौप्य पदक पटकावलं आहे. नीरजनं ८७ पूर्णांक ८६ मीटर अंतरावर भाला फेकला, त्याचं सुवर्णपदक केवळ एका सेंटीमीटरनं हुकलं. या स्पर्धेत अँडरसन पीटर्स सुवर्ण तर जर्मनीच्या ज्युलियन वेबर यानं कांस्य पदक पटकावलं.

<><><><><>

हंगेरीची राजधानी बुडापेस्ट इथं सुरू असलेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या चौथ्या फेरीत भारतीय संघाने खुल्या आणि महिला अशा दोन्ही गटात विजय मिळवला. खुल्या गटात भारतानं सर्बियाचा पराभव केला, तर महिला संघानं फ्रान्सवर विजय मिळवला. आज पाचव्या फेरीत महिला संघाचा सामना कझाकिस्तानशी तर खुल्या गटात अझरबैजानसोबत लढत होणार आहे

<><><><><>

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, ओमानमधल्या गणेशोत्सवाविषयी.

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागानं चक्र ३ या मोहिमेअंतर्गत, एक अत्याधुनिक आभासी चलन आणि बुलियन-समर्थित सायबर गुन्हेगारांची टोळी

उद्धस्थ केली. या प्रकरणी सीबीआयनं मुंबईतून एका व्यक्तीला अटक केली आहे. हा आरोपी 2022 पासून परदेशातल्या व्यक्तींना लक्ष्य करत असल्याचं सीबीआयनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

रशिया आणि युक्रेननं त्यांच्यात सुरु असलेल्या संघर्षादरम्यान पकडलेले २०६ युद्धकैद्यी सुटकेनंतर मायदेशी परतले आहेत. कुर्स्क प्रदेशात पकडलेल्या एकशे तीन रशियन सैनिकांची, एकशे तीन युक्रेनियन युद्धकैद्यांच्या बदल्यात सुटका करण्यात आली आहे.

**<><><><><>**